संफौ.ख.क्र. ५९/२०२५
शासन वि. वसंत नरळे

MHSN07000100-2025
नि.क्र. ०९ सोबत

## न्यायनिर्णय

## (अधिघोषणा दिनांक ०७.०३.२०२६)

अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर व उभय बाजुचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे विचाराधीन निघतात. त्यावरील कारणांसहीत निष्कर्ष खालील प्रमाणे

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ०१.०३.२०२४ रोजी १७.५० वाजण्याच्या सुमारास नांगोळे गावच्या हद्दीत आरोपी प्रोव्ही गुन्ह्याचा माल देशी दारुच्या बाटल्या विनापरवाना बेकायदेशीर चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने मुद्देमाल जवळ बाळगल्याच्या स्थितीत मिळून आला? | ... नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. १ व २</u> :-**

**२.** आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने सा.क्र.१ दिपक बापू वाघमारे, पंच साक्षीदार यांची साक्ष नि.क्र. ०९ सोबत नोंदविली. पुरेशी संधी देवून देखील फिर्यादी व तपासीक अधिकारी यांची साक्ष अभियोग पक्षाने नोंदविलेली नाही,

**सं.फौ.ख.क्र. ५९/२०२५**
**शासन वि. वसंत नरळे**

त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र.१ वरील आदेशाने बंद करण्यात आला.

३. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला सा.क्र.१ पंच दिपक बापू वाघमारे यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, दिनांक ०१.०३.२०२४ रोजी पोलिसांनी त्याला पंचनाम्यासाठी पोलीस ठाण्यात बोलाविले होते. त्यांना दाखवण्यात आलेल्या पंचनाम्यावर त्यांची सही आहे परंतू त्यातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे सांगितले. सदरील साक्षीदार अभियोग पक्षास मदत करीत नसल्यामुळे त्यांची साक्ष अभियोग पक्षास उपयुक्त नाही.

०४. प्रकरणातील पंच साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्याने अभियोग पक्षास मदत केलेली नाही. तसेच तपासीक अधिकारी यांनी सदर प्रकरणात रासायनिक पृथःकरण अहवाल दाखल करणे महत्वाचे होते, परंतू पुरेशी संधी उपलब्ध असुन देखील त्यांनी रासायनिक पृथःकरण अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे जप्त केलेला मुद्येमाल ही दारुच होती तसेच ती आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केली किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे आरोपीविरुध्द ठोस पुरावा अभिलेखावर अभियोग पक्ष आणु शकलेला नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी व तपासीक अधिकारी यांना वारंवार समन्स काढुन देखील त्यांना हजर ठेवण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र. १ वरील आदेशाने बंद करण्यात आला. त्यामुळे आरोपीविरुध्द ठोस पुरावा अभिलेखावर अभियोग पक्ष आणु शकलेला नाही.

०५. आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(इ) खाली गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने निर्विवादपणे व शाश्वत संशयापलीकडे जावून सिध्द केलेली नाही असे माझे मत आहे. सबब मी मुददा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी देवून मुददा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**सं.फौ.ख.क्र. ५९/२०२५**
**शासन वि. वसंत नरळे**

## आदेश

१. आरोपी **वसंत गोविंद नरळे** यास मुंबई दारुंबंदी अधिनियम कलम ६५ (इ) मधुन फौजदारी प्रक्रीया संहीता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे पुर्वीचे बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७ –अ प्रमाणे रक्कम रूपये १५,०००/ चा वैयक्तीक स्वबंधपत्र दाखल करावे.

४. जप्त मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क कार्यालय यांच्याकडे नियमाप्रमाणे नाश करण्यासाठी पाठवण्यात यावा.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायलयात घोषीत करण्यात आला.

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.03.07 16:43:51 +0530

**कवठेमहांकाळ** **(एम.ए.कुलकर्णी)**
**दिनांक : ०७.०३.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**कवठेमहांकाळ.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 07.03.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 07.03.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 07.03.2026 |